Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol. (II)

12 January 2012 Special Issue – 92

## Recent Trends In Public Adminstration : Theories, Practice & Future

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Executive Editor of This Issue
Dr. Bidwe T.S.
Assit. Prof. Head of Dept.
*Public Administraion*
*Vasant Mahavidalaya . Kaij. Dist. Beed*

SWATIDHAN PUBLICATION
Visit to - www.researchjourney.net

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92, Recent Trends in Public Adinistration : Theories, Practice & Future

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | पर्यावरणीय आव्हान : समस्या व उपाय | डॉ.सोमवंशी मुक्ता गोविंदराव | 7 |
| 2. | जनसहभागिता एक समस्या | डॉ. प्रकाश रावसाहेब शिंदे | 10 |
| 3. | आपत्ती व्यवस्थापन - संकल्पना | डॉ. दाणे बी.एल. | 12 |
| 4. | आपत्ती व्यवस्थापनात महाराष्ट्र प्रशासनाची भूमिका | प्रा.आकोलकर आशा दगडू | 13 |
| 5. | भारतातील माहिती अधिकारापुढील समस्या | डॉ. जयदेव मोहिते | 16 |
| 6. | अवर्षण एक आपत्ती: कारणे, परिणाम आणि उपाय | प्रा. डॉ. जाधव अशोक काकासाहेब | 18 |
| 7. | Disaster Management | अर्चना भगवानराव काळे | 20 |
| 8. | पर्यावरणीय जलप्रदुषण समस्या एक भौगोलीक अभ्यास | डॉ. बोबडे बी.बी. | 25 |
| 9. | अवर्षण एक नैसर्गीक आपत्ती | डॉ. जयदीप रामकृष्ण सोळुंके | 28 |
| 10. | आपत्ती व्यवस्थापन : एक प्रशासकीय आव्हान | प्रा. डॉ.नंदकुमार एन कुंभारीकर | 33 |
| 11. | पर्यावरणीय आव्हानावर शाश्वत विकास हाच मार्ग | प्रा.डॉ.गंगणे जीवन सुदामराव | 35 |
| 12. | लोकप्रशासनातील पारदर्शकता; माहितीचा अधिकार विशेष संदर्भ | प्रा. डॉ. वैशाली शेषराव पेरके | 37 |
| 13. | आपत्ती व्यवस्थापन आणि मानव संरक्षण : एक अभ्यास | प्रा. जी.एन.सोनवणे | 41 |
| 14. | पर्यावरणीय आव्हान | प्रा.डॉ. चव्हाण बी.एम. | 43 |
| 15. | **प्रशासकीय संस्कृती** | **प्रा.डॉ. बी.आर. कतुरवार** | **46** |
| 16. | Concept of Ombudsman (Lokpal) | Mr.Mahesh Jaiwantrao Patil | 51 |
| 17. | Environment protection – A legal and judicial perspective | Smt. Pradhnya P. Sawarkar | 55 |
| 18. | Theory and Practice of Public Administration in Globalized Era | Dr. M. C. Pawar | 58 |
| 19. | Origin Of Public Private Partnership | Dr.Bhagwansing M. Bainade | 62 |
| 20. | Concept of E-Governance | Dr.Meer Bashrat Ali | 66 |
| 21. | जागतिक लोकसंख्येची वाढ आणि पर्यावण | डॉ. विठ्ठल शंकरराव देशमुख | 69 |
| 22. | एनआरएचएम अंतर्गत जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमामध्ये 102 टोल फ्री क्रमांक (Referal Transport) सेवेची भूमिका | प्रा. संजय मारोतराव देबडे | 70 |
| 23. | दुष्काळाची कारणे आणि उपाय | प्रा.डॉ.एस.जी.गव्हाणे | 73 |
| 24. | लोकप्रशासनातील नवीन संकल्पना आणि सिध्दांत | प्रा.डॉ.भगवान श्रीपती सांगळे | 75 |
| 25. | नोकरशाहीचे प्रकार (Types of Bureauecacy) | प्रा. डॉ. उलगडे लक्ष्मण काशिनाथ | 78 |
| 26. | माहिती तंत्राज्ञान आणि प्रशासकीय बदल | प्रा. डॉ. वसंत पांडूरंग सरवदे | 81 |
| 27. | भारतीय परिप्रेक्ष्यातून सु-शासन | प्रा. व्ही. ए. गायकवाड | ८३ |
| 28. | माहिती तंत्रज्ञानाचा लोकप्रशासनावरील परिणाम : ई-शासन | प्रा. डॉ. संजय कांबळे | 86 |
| 29. | सायबर सुरक्षितता | प्रा.डॉ. उर्मिला गोविंद रेड्डी | 88 |
| 30. | लोप्रशासनातील नवप्रवाह आव्हाणे आणि संधी | प्रा. डॉ. अमोल काळे | 92 |
| 31. | भारतातील आपत्ती व्यवस्थापन प्रशासन | डॉ. गजानन चिट्टेवाड | 94 |
| 32. | खाजगीकरण व लोकप्रशासन | डॉ. प्रतिभा श. उन्हाळे | 97 |
| 33. | सुशासनासाठी माहिती अधिकार | प्रा.डॉ. कालिदास दिनकर फड | 100 |
| 34. | पर्यावरणाचा सजीवांच्या आरोग्यासी संबंध एक विश्लेषण. | प्रा.प्रकाश खुळे | 102 |


EDUCATION SOCIETY'S ... COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | January 2019 | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | UGC Approved No. 40705
Special Issue 92, Recent Trends in Public Adinistration : Theories, Practice & Future

ADARSH EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

# प्रशासकीय संस्कृती

प्रा.डॉ. बी.आर. कतुरवार
लोकप्रशासन विभाग प्रमुख, देगलूर महाविद्यालय देगलूर, ता.देगलूर जि.नांदेड

---

## प्रास्ताविक

प्रत्येक देशाच्या प्रशासन व्यवस्थेत दोन घटक अत्यंत महत्वाचे असतात त्यातील एक म्हणजे लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी व दुसरे म्हणजे लोकसेवक जे गुणवत्तासंपन्न,अनुभवी ,कार्यक्षम व कायमची नोकरी असलेले असतात. लोकसेवकांच्या (सनदी सेवकांच्या) कार्यक्षमतेवरच शासकीय धोरणाचे भवितव्य अवलंबून असते, त्यामुळे लोक सेवक हा प्रशासकीय व्यवस्थेतेचा आत्मा मानला जातो. आधुनिक शासनानेलोकशाही, लोककल्याणकारी राज्य,धर्मनिरपेक्षता, समाजवाद स्वातंत्र्य, समता, न्यायमं, बंधुता कायद्यापुढे सर्व समान या आदर्श मानवी मुल्यांचा स्वीकार केला आहे. त्यामुळे शासनाच्या पर्यायाने प्रशासनाच्या कार्यात व जबाबदारीत प्रचंड वाढ झाली आहे.

राज्यघटना व शासनकर्त्यांनी आखलेले धोरण कितीही आदर्श असले तरी कार्यक्षम लोकसेवेशिवाय ते यशस्वी होऊ शकत नाही. गुणवत्ता संपन्न कार्यक्षम व निष्ठेने कार्य करणारे लोक सेवक असतील तरच देशाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. या उलट लोक सेवक आळशी ,कामचुकार व चारित्र्यहीन असतील तर प्रशासनात गोंधळ निर्माण होतो,म्हणूनच राष्ट्राला चारित्र्यसंपन्न प्रामाणिक व कार्यक्षम लोक सेवकांची आवश्यकता असते. लोकप्रशासनाचे यशापयश त्यातील मानवी शक्तीवरच अवलंबून असते. शासनाचे धोरण व विविध विकासात्मक योजनांची यशस्विता लोकसेवकांच्या गुणवत्तेवरच अवलंबून असते.

लोककल्याणकारी राज्यात लोकसेवेच्या भूमिकेला व प्रशासकीय संस्कृतीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अर्थात लोक सेवा व प्रशासकीय संस्कृती ही वेगवेगळ्या स्वरुपात प्राचीन काळापासून अस्तीत्वात असलेली दिसून येत आहे. काळानुरूप तिच्या स्वरुपात बदल होत गेला. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात राजाने दिलेल्या आदेशाची अमलबजावणी करणारा नोकरवर्ग कार्यरत होता, त्याकाळात राज्याचा खाजगी संपत्तीची व्यवस्था पाहणारा नोकरवर्गही कार्यरत होता, असे काम मिळणे त्याकाळी अभिमानाची गोष्ट समजली जात होती.प्रस्तुत लेखात प्रशासकीय संस्कृतीचा अभ्यास करण्यात आला आहे.

आधुनिक काळात शासनाने पर्यायाने प्रशासनाने लोकशाही मुल्यांचा स्वीकार केला आहे. लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा स्वीकार केलेल्या शासनकर्त्यांना विविध कामे पार पाडण्यासाठी लोक सेवकाची नितांत आवश्यकता असते. पूर्वीच्या काळी लोकसेवकांची (सनदी सेवकांची ) कार्ये अतिशय मर्यादित स्वरुपाचे होते. आधुनिक काळात शासन व प्रशासन व्यवस्थेचे कार्ये व कार्यक्षेत्र व्यापक बनले आहे. लोक सेवक नसतील तर आधुनिक शासनकर्त्यांना राज्याचा कारभार चालविता येणे देखील अशक्य आहे. शासनाने आखलेल्या ध्येय -धोरणाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी कार्यक्षम प्रशासन यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. त्यामुळे आधुनिक काळात लोकसेवेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.लोकसेवा ( सनदी सेवा) ही प्रशासनाची आधारशीला बनली आहे.

कोणत्याही देशातील प्रशासन व्यवस्था ही तेथील मानवी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अखंडपणे काम करीत असते. प्रशासन व्यवस्था ही त्या देशातील समाज व्यवस्थेच्या विकासाचे महत्वपूर्ण साधन होय. अर्थात प्रशासन व्यवस्थेची उभारणी .करताना त्या त्या देशाची संस्कृती,इतिहास, राजकीय व्यवस्था, सामाजिक व्यवस्था, अर्थ व्यवस्था इत्यादीचा सखोल अभ्यास करूनच प्रशासन व्यवस्था निर्माण केली जाते.

लोकप्रशासन व्यवस्थेतील अधिका-यांचा दृष्टीकोन, आचरण मूल्य मानसिकता, संवेदना इत्यादी वरूनच त्या देशातील प्रशासकीय संस्कृती Administrative Culture लक्षात येत असते. विशेष म्हणजे प्रशासन व्यवस्था ही सांस्कृतिक मूल्याच्या आधारेच निर्माण करण्यात आलेली असते. प्रशासन व्यवस्था देखील संस्कृतीप्रिय अथवा संस्कृतीनिष्ठ असते. आपल्या भारत देशातील प्रशासन व्यवस्थेचा तटस्थपणे अभ्यास केल्यास वस्तुस्थिती गंभीर स्वरुपाची असलेली दिसून येते.

इ.स. २०१२ मध्ये सिंगापूर मधील "पॉलीटिकल अंड इकॉनॉमिकल रिस्क कन्सलटन्सी" या प्रतिष्ठीत संस्थेने जगातील अनेक देशातील प्रशासन व्यवस्थेचा संशोधनात्मक पद्धतीने अभ्यास केला. त्यात भारतातील प्रशासन व्यवस्था ही आशिया खंडातील सर्वात कामचुकार, भ्रष्टाचारी,आणि ढिसाळ असल्याचे म्हंटले आहे. भारतातील प्रशासकीय अधिका-याची मानसिकता,बाह्य दृष्टीकोन (Outlook) नकारात्मक स्वरूपाचा असलेला दिसून येतो.

कोणत्याही देशातील समाज व्यवस्थेत प्रशासकिय अधिका-याची भूमिका ही अत्यंत महत्वपूर्ण असते. प्रशासन व्यवस्थेसाठी प्रशसकीय संस्कृती हे एक महत्वपूर्ण पण गुंतागुंतीचे तत्व असते. विशेष म्हणजे प्रशासकीय अधिकारी वर्ग हा संघटीत असतो. हा वर्ग आपली गुणवत्ता सिद्ध करून एका समानतेच्या तत्वाने प्रशासनात सहभागी झालेला असतो. त्यामुळे हा संघटीत वर्ग एकमेकांशी जवळीकता निर्माण केलेला असतो. तो सतत परस्पर संपर्क साधत असतो. त्यातूनच काही

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92, Recent Trends in Public Adinistration : Theories, Practice & Future

आचरणासंदर्भातील मानके किंवा मापदंड निर्माण होत असतात. प्रशासनातील अधिकाऱ्यांचा दृष्टीकोन, मानसिकता व वर्तन यावरून त्याची प्रशासकीय संस्कृती जाणून घेता येते.

**प्रशासकीय संस्कृतीचा अर्थ**

प्रशासकीय संस्कृती हा शब्द आपणाला नवीन वाटत असला तर तो मुळ संस्कृतीशी निगडीत आहे. कारण प्रत्येक देशातील प्रशासन व्यवस्था ही त्या देशाच्या सांस्कृतिक मुल्यांच्या आधारेच निर्माण केलेली व विकसित केलेली असते. प्रशासन व्यवस्था ही तेथील संस्कृतीशी एकनिष्ठ असते. जर प्रशासनात दोष–उणीवा असतील तर त्याचे मुळ कारण तेथील समाजात व संस्कृतीत सापडते. प्रशासकीय संस्कृती ही त्या देशातील मूलभूत संस्कृतीला अनुसरूनच विकसित झालेली असते.

समाज व्यवस्थेतील मूल्य, विचारसरणी, आचरण, दृष्टीकोन यातूनच प्रशासकीय संस्कृती निर्धारित होत असते. भारतातील समाज व्यवस्थेत व संस्कृतीत कामचुकारपणा, आळस, असंवेदनशीलता, आपली जबाबदारी इतरांवर ढकलणे, कुरघोडी करणे, स्वतःची चूक अमान्य करणे, भ्रष्टाचार इत्यादी बाबी प्राचीन काळापासून कमी अधिक प्रमाणात अस्तित्वात असलेल्या दिसून येतात यातूनच भारतातील प्रशासकीय संस्कृती तयार झाली आहे. ग्रामीण समाजात "सरकारी काम अन सहा महिने थांब" अशी म्हण तयार झाली आहे.

सारांश,अधिकारी वर्गाची मानसिकता, दृष्टीकोन, विचारसरणी, वृत्ती, आचरण इत्यादी वरून तेथील प्रशासकीय संस्कृती व कार्य संस्कृती जाणून घेता येते. लोकप्रशासन शास्त्रातील ज्येष्ठ लेखिका डॉ. प्रिता जोशी असे म्हणतात की प्रशासनातील अधिकारी वर्गाचा दृष्टीकोन त्यांना ध्येय साध्य करण्यासाठीचे प्रयत्न, मनातील उद्देश, राजकीय व सामाजिक पर्यावरण , समाजाविषयी भूमिका, नागरिकांप्रती कर्तव्य या सर्वांची मिळून प्रशासकीय संस्कृती निर्माण होत असते.

प्रशासकीय कार्य सकारात्मक दृष्टीकोनातून व कायदेशीर मार्गानेच पूर्ण करणे हे आदर्श प्रशासकीय संस्कृतीचे प्रतिक मानता येते. याउलट वरिष्ठांनी सोपविलेले प्रशासकीय कार्य शिक्षा समजून करणे, तणाव ग्रस्तेने करणे किंवा चुकीच्या पद्धतीने काम करणे या बाबी प्रशासकीय संस्कृतीला अनुसरून नसतात. उदा: जपानमध्ये एखाद्या राष्ट्रपुरुषाचे निधन झाल्यास अधिकारी कर्मचारी राष्ट्रपुरुषाला आदरांजली म्हणून कार्यालयीन नियोजीत वेळेपेक्षा एक तास अधिक काम करतात. शिवाय दैनंदिन कामे करताना देखील काही दिवस अधिक काम केल्यास त्या जास्तीच्या कामाचा मोबदला कधीही घेत नाहीत. याउलट भारतातील प्रशासकीय संस्कृतीचा अभ्यास केल्यास कामचुकारपणा, बेजबाबदारपणा, औपचारिकता, लाचखोरीवृत्ती, भ्रष्टाचार, यशाचे श्रेय स्वतः घेणे व अपयशाची जबाबदारी इतरावर ढकलणे इत्यादी बाबी मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

**प्रशासकीय संस्कृतीच्या निर्मितीचा आधार**

प्रशासकीय संस्कृती ही प्रत्येक देशातील मूळ संस्कृतीशी अनुरूप विकसित झालेला संस्कृतीचा एक भाग आहे. प्रशासन व्यवस्थेची उभारणी करताना त्या देशाचा इतिहास, समाज व्यवस्था, राजकीय व्यवस्था, अर्थ व्यवस्था, संस्कृती यातूनच प्रशासकीय संस्कृती विकसित होत असते. कोणत्याही देशातील प्रशासकीय व कार्य संस्कृतीच्या निर्मितीचा आधार खालील बाबीवरून स्पष्ट होते.

**१.सर्व सामान्य संस्कृतीचा आधार**

प्रशासकीय संस्कृतीचा मूलाधार हा त्या देशातील पूर्वापार चालत आलेली संस्कृती असतो. ज्या संस्कृतीमध्ये मानवतावादी मूल्य रुजलेली असतात तेथील प्रशासन व्यवस्थेत देखील ही मानवतावादी मूल्य दिसून येतात. याउलट जेथे भ्रष्टाचार, बेजबाबदारपणा, कामचुकारपणा सर्व सामान्य संस्कृतीत असतो. तेथील प्रशासन व्यवस्थेत देखील या बाबी दिसून येतात. सारांश सर्वसामान्य संस्कृतीमधील अनुकूल अथवा प्रतिकूल बाबी प्रशासकीय संस्कृतीत देखील दिसून येतात.

**२.ऐतिहासिक आधार**

कोणत्याही प्रशासकीय संस्थेचा अभ्यास करताना ती संस्था किंवा खाते का निर्माण करण्यात आले ? हे जाणून घेण्यासाठी सर्व प्रथम इतिहासाचा आधार घ्यावा लागतो. प्रशासन व्यवस्थेवर त्या देशाच्या इतिहासाचा फार मोठा प्रभाव पडलेला असतो. उदा: भारताला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे झाले तरी ब्रिटीशानी निर्माण केलेली प्रशासनाची पोलादी चौकट आज देखील भक्कम स्वरुपात अस्तित्वात असलेली दिसून येते.

**३. सामाजिक व आर्थिक व्यवस्थेचा आधार**

समाजातील गुणवत्ता संपन्न तरुण तरुणी प्रशासन व्यवस्थेत सहभागी होत असतात. समाज जीवन जगत असताना सभोवतालचे वातावरण, राहणीमान, विचारसरणी, वेशभूषा, केशभूषा, मूल्य, दृष्टीकोन, वृत्ती इत्यादी बाबीतून व्यक्तीचे सामाजिकरण होत असते. प्रशासन व्यवस्थेत काम करणारा प्रत्येक घटक हा समाजातूनच प्रशासनात आलेला असतो. सहाजिकच सामाजिक मूल्य व विचारसरणीचा प्रभाव प्रशासकीय संस्कृतीत देखील मोठ्या प्रमाणात दिसून येतो.

त्याच प्रमाणे देशाची अर्थ व्यवस्था भांडवलवादी आहे की साम्यवादी आहे. या विचारसरणीचा देखील प्रभाव प्रशासकीय संस्कृतीवर पडत असतो.

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019
Special Issue 92, Recent Trends in Public Adinistration : Theories, Practice & Future | UGC Approved No. 40705

४.राजकीय व्यवस्था व राजकीय नेतृत्व

साधारणतः राजकीय नेत्याने देशाच्या सर्वांगीण विकासाचे धोरण निर्धारित करावे, घोषित करावे आणि प्रशासन यंत्रणेने त्या धोरणाची अंमलबजावणी करावी, हे तत्व रूढ झालेले आहे. राज्यव्यवस्था आणि प्रशासन व्यवस्था ही देशाच्या विकास रथाचे दोन चाके मानले जातात. साहजिकच राजकीय संस्कृतीचा प्रभाव प्रशासकीय संस्कृतीवर पडत असतो. राजकीय संस्कृतीमधून प्रशासकीय संस्कृती विकसित होत असते. उदा: स्वातंत्र्यानंतर शासन संस्थेने लोककल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारली त्यानुसार प्रशासन व्यवस्था देखील लोककल्याणकारी असल्याचे दिसून येते.

प्रशासकीय संस्कृतीच्या -हासाची कारणे

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात लोकशाही मूल्यावर आधारित आदर्श प्रशासन व्यवस्था निर्माण करण्यात आली. जनतेचा सर्वांगीण विकास साधण्याचे प्रभावी साधन म्हणून लोकप्रशासन व्यवस्था व अधिकारी वर्गाच्या भूमिकेला सर्वाधिक महत्व प्राप्त झाले. परंतु वर्तमान काळात सर्वसामान्य नागरिक जेंव्हा कोणत्याही प्रशासकीय कार्यालयात जातो तेंव्हा तेथील अधिकारी-कर्मचारी वर्ग कायदा-नियम व उपनियमांची भीती दाखविली असतो. त्यामुळे सामान्य नागरिकांचा प्रशासन व प्रशासनातील अधिकारी वर्गाकडे पाहण्याचा दृष्टीकोन नकारात्मक बनलेला दिसून येतो. प्रशासन व्यवस्थेतील प्रशासकीय संस्कृतीचा –हास मोठ्या प्रमाणात झाला आहे. अर्थात कोणत्या कारणांमुळे प्रशासकीय संस्कृतीचा –हास झाला आहे ते आपण जाणून घेऊ या.

१.अहंभावी वृत्ती

भारततील प्रशासनाभोवती असलेली पोलादी चौकट ब्रिटिश काळात निर्माण झालेली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील ब्रिटिश अधिकारी स्वतःला श्रेष्ठ व असामान्य समजत होते. त्यांची मानसिकता, मनोवृत्ती व आचरण हे शोषणकारी स्वरूपाचेच होते. आज देखील ही वृत्ती भारतातील प्रशासकीय अधिकारी वर्गामध्ये काही प्रमाणात दिसून येते. परिणामी आज देखील नोकरशाहीच्या ब्रिटिश भूमिकेबद्दल जनसामांन्यात नकारात्मक दृष्टीकोन दिसून येतो. ब्रिटीश अधिका-यांमध्ये असलेली अहंभावी वृत्ती आपल्याला भारतातील अधिकारी वर्गामध्ये दिसून येते . प्रशासनातील अधिकारी वर्ग आज देखील आपण सर्वसामान्य जनतेपेक्षा वेगळे आहोत,अधिक श्रेष्ठ आहोत,बुद्धिमान आहोत अशा वृत्तीने वर्तन करणारे मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

२.पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण

मानव सेवा हीच ईश्वर सेवा तसेच 'जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत ' असा संदेश भारतीय संस्कृती देते. हे जरी खरे असले तरी आज समाजात भौतिक सुखाच्या व भोगवादाच्या मागे लागलेला वर्ग प्रचंड मोठ्या प्रमाणात दिसून येतो. खा, प्या व मजा करा ही वृत्ती प्रशासकीय अधिकारी वर्गात्त मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसून येते. बहुतांश अधिकारी अधिकाधिक संपत्ती मिळवण्यासाठी पदाचा दुरुपयोग मोठ्या प्रमाणात करताना दिसत आहेत. गाडी, बंगला या शिवाय इतर चंगळवादाला बळी पडून कर्तव्य विसरत आहेत.

३.राजकीय तटस्थतेचा देखावा

प्रशासकीय अधिकारी कर्मचारी हे राजकीय पक्षापासून व राजकारणापासून अलिप्त असावेत हे लोकप्रशासनातील आदर्श तत्व स्वीकारण्यात आले आहे पण प्रत्यक्षात असे दिसून येते की, अनेक वरिष्ठ अधिकारी विशिष्ठ राजकीय पक्षाला किंवा राजकीय नेत्याला आपल्या निष्ठा अर्पण करतात व सेवा निवृत्तीनंतर किंवा तत्पूर्वी स्वेच्छा सेवानिवृत्ती घेवून राजकीय निवडणुकीत सहभागी होतात.

म्हणजेच केवळ औपचारिक दृष्टीने अधिकारी राजकीयदृष्ट्या तटस्थ असतात पण प्रत्यक्षात राजकीय मंत्री खासदार आमदार यांच्याशीच अधिक बांधील असेलेले पहावयास मिळतात. राजकीय तटस्थता हा केवळ देखावा असतो,परिणामी प्रशासकीय संस्कृतीवर प्रतिकूल परिणाम पडतो.

४.अधिकारी-कर्मचा-यांची केवळ संख्यात्मक वाढ

स्वातंत्र्य प्राप्तीच्या नंतर भारतातील प्रशासन व्यवस्थेत अधिकारी –कर्मचारी वर्गाच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे परंतु त्यांची कार्यक्षमता, प्रामाणिकता मात्र म्हणावी तेवढी विकसित झालेली दिसून येत नाही . आपण जनतेचे नोकर किंवा सेवक आहेत याची जाणीव अधिकारी वर्गाला राहिलेली नाही परिणाम प्रशासकीय संस्कृतीच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे

५.अधिकारी वर्गाचा सामान्य नकारात्मक दृष्टीकोन

भारतासारख्या विकसनशील राष्ट्रातील अधिकारी वर्गाचा सर्वसामान्य नागरिकांप्रती नकारात्मक दृष्टीकोन असलेला दिसून येतो. कोणत्याही प्रशासकीय कार्यालयात गेल्यानंतर सर्व सामान्य जनतेला कायदा-नियम व उपनियमांची भीती दाखविली जातेआणि सर्वसामान्य माणसाची कामे विलंबाने होतात. परिणामी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात प्रशासन व प्रशासकीय अधिकारी वर्गाविषयी रोषाची भावना निर्माण होते. प्रशासकीय अधिका-याबाबत नकारात्मकता वाढते.

६.सामान्य जनतेप्रती असंवेदनशीलता

ज्या अधिकारी कर्मचाऱ्यांची नियुक्तीच मुळात जनतेची सेवा करण्यासाठी,हित जोपासण्यासाठी आलेली असते तोच वर्ग स्वतःला सर्वश्रेष्ठ व वेगळा समजत असतो . आपणास विशेष अधिकार आहेत त्यामुळे आपण सर्व सामान्य जनतेपेक्षा श्रेष्ठ आहोत सर्वेसर्वा आहोत अशी मानसिकता बहुतांश अधिकारी वर्गाची झालेली दिसून येते.जेव्हा नागरिक एखाद्या प्रशासकीय कार्यालयात जातो तेंव्हा अधिकारी वर्गाकडून आदराची किंवा सौजन्याची वागणूक मिळत नाही. येथील प्रशासन व्यवस्थेत सेवा संस्कृती ऐवजी धाक दाखविण्याची वृत्ती दिसून येते. परिणामी सामान्य व्यक्ती प्रशासन व्यवस्थेबद्दल नकारात्मक दृष्टीकोन बाळगतो.

कार्यसंस्कृतीच्या संवर्धनासाठीचे उपाय

१.मानवी संबंधाची जपवणूक करणे

अधिक चांगला प्रशासक व्हायचे असेल तर प्रशासकीय कार्यालयातील सर्व व्यक्तिंबरोबर मानवी संबंध स्नेह पूर्ण विकसित करणे आवश्यक आहे. प्रशासकीय कार्यालयात विविध कामासाठी दररोज सामान्य नगरीक येत असतात. कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला प्रेमाची व आपुलकीची वागणूक देणे अत्यंत आवश्यक असते. त्यांना,"या बसा, आपण कोणते काम घेवून आला आहात?" असे आदर पूर्वक विचारल्यास नागरिकांच्या मनात आपुलकीची भावना निर्माण होते व तो आनंदी बनतो.

आज जगभरात मानवाला कोणत्याही साधन सामग्रीची कमतरता भासू नये म्हणून सतत संशोधन चालू असलेले दिसून येते. परंतु मानव हे एक असे संसाधन आहे की ज्याला योग्य व सक्षम पर्याय कधीही मिळू शकत नाही. मानवी मन हे संवेदनशील असते. आपआपसातील संबंध सांभाळण्याचे काम मन करते. त्यामुळे प्रशासनातील एखादे काम नियमानुसार होत नसेल तर तसे संबधिताला सांगताना त्याचे मन दुखावणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. **मानवाने मानवाशी मानवासारखे वागावे** हाच मानवी संबंधाची जपवणूक करण्याचा मूलमंत्र असून त्याकडे लक्ष केंद्रित करण्यात यावे.

२. कल्पकता

प्रशासनात पारंपरिक पद्धतीने काम करणे, डोक्याला त्रास नको किंवा जुने ते सोने या वृत्तीने काम करणाऱ्या व्यक्तींना ही वृत्ती सोडणे आवश्यक आहे. प्रशासकाने आपल्या ज्ञानाचा उपयोग सामाजिक, आर्थिक विकासाबरोबर प्रशासकीय कौशल्य विकसित करण्यासाठी करणे आवश्यक आहे. प्रयोगशीलता आणि क्रियाशिलतेतच जीवनाची सार्थकता आहे. अशी विचारसरणी तयार करणे आवशयक आहे प्रशासनात ज्ञानाचा परिणामकारक वापर केल्यास प्रशासकिय सेवेची कार्यक्षमता व गुणवत्ता वेगाने वाढेल.

मानवाची जिज्ञासू वृत्ती, कल्पक विचार, नवनवीन कल्पना ह्या बाबी ज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असतात. आजचे युग हे गतिमान आहे. लोकांच्या प्रशासनाकडून अपेक्षा वाढत आहेत. कार्पोरेट संस्कृती प्रशासनात येत आहे .लोक कामासाठी थांबायला किंवा प्रतीक्षा करायला तयार नाहीत, अशा वेळी प्रशासकाला आपली भूमिका बदलणे गरजेचे आहे. प्रशासनातील विविध कामे करताना आपल्या कल्पकतेचा व सर्जनशिल्तेचा उपयोग करून अधिकाधिक लोकांचे हित जोपासून कार्य संस्कृती विकसित करावी लागेल.

३.कामामध्ये व्यवसायिकता आणावी

भारतीय समाज मानसिकतेत नौकरी आणि व्यवसाय या भिन्न बाबी समजल्या जातात. इतकेच नव्हे तर व्यवसाय आपला आणि नोकरी दुस-यासाठी अशी भावना दिसून येते. व्यवसायात व्यक्ती समर्पित भावनेने किंवा जीव ओतून काम करीत असतो या उलट नोकरीच्या ठिकाणी वेळकाढूपणा (Time Pass) किंवा औपचारिकता पूर्ण करण्याकडे लक्ष केंद्रित केले जाते.

उदाहरण द्यावयाचे झाल्यास एखाद्या दुकानात ग्राहकाचे समाधान हाच आमचा नफा या तत्वाने ग्राहकाला दर्जेदार सेवा देण्याचा प्रयत्न केला जातो. या उलट प्रशासन तथा नोकारशाहीत नागरिक कामासाठी अनेक तास ताटकळत उभे असतांना अधिकारी-कर्मचारी मात्र मोबाईलवर गप्पा मारताना व्यस्त असलेले आपणास पहावयास मिळतात. ही वृत्ती बदलून खाजगी व्यवसायात जितकी कार्याची बांधिलकी असते, व्यावसायिकता असते त्याप्रमाणे नोकरीच्या ठिकाणी तळमळ व व्यावसायिक्ता निर्माण होणे गरजेचे आहे.

४.कार्यालयीन स्वच्छतेला महत्व द्यावे

प्रशासकीय संस्कृती व कार्य संस्कृतीवर सतत प्रभाव टाकणारा घटक म्हणजे कार्यालयीन स्वच्छता होय. त्यामुळे स्वच्छता देखील एक प्रशासकीय संस्कार होय. आपण ज्या ठिकाणी आठ ते दहा तास काम करीत असतो ती जागा व परिसर स्वच्छ असणे गरजेचे असते. जर कार्यालयात प्रचंड अस्वच्छता असेल तर तिथे प्रसन्नता राहू शकत नाही कार्यालय सुव्यवस्थित, स्वच्छ , टापटीप व प्रसन्न ठेवले पाहिजे ज्यामुळे कार्यात उत्साह वाढतो पर्यायाने कार्य संस्कृती व प्रशासकीय संस्कृती संवर्धित होते.

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN: 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92, Recent Trends in Public Adinistration : Theories, Practice & Future

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

५.शुद्ध व नैतिक आचरण

प्रशासनात काम करीत अताना कमी ज्ञान, कौशल्याचा अभाव,या सारख्या बाबी असतिल तर फारसा फरक पडत नाही पण एखाद्या व्यक्तिचे आचरण नैतिक चौकटीच्या आत नसेल तर तो अधिकारी कनिष्ठावर प्रभावी पणे नियंत्रण ठेवू शकत नाही. नैतिक आचरण हाच प्रशासकीय संस्कृतीचा पाया असतो. प्रत्येक कृती करताना कायदा व नियमांचा आधार तर घ्यायाला हवा पण त्याच बरोबर नैतिक दृष्टीकोनातून पाहणे गरजेचे आहे.

प्रशासकीय संस्कृती व कार्य संस्कृतीची माहिती आपण जाणून घेतल्यानंतर त्याच्या संवर्धनाची मुख्य जबाबदारी कोणाची ? असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. अर्थात यथा राजा तथा प्रजा या तत्वानुसार प्रशासनात देखील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वर्तनाचे अनुकरण कनिष्ठ कर्मचारी करीत असतात. त्यामुळे वरिष्ठांनी आदर्श व प्रामाणिक आचरण करून कार्य संस्कृती व प्रशासकीय संस्कृती संवर्धित केली पाहिजे.

प्रशासन व्यवस्था अधिकाधिक पारदर्शक, गतिशील व स्वच्छ बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या व नव्याने प्रशासकीय सेवेत येणाऱ्या व्यक्तींना वेळोवेळी प्रशिक्षण देवून कार्यसंस्कृती विकासित केली पाहिजे. प्रशासनात काम करीत असताना जनतेची कामे अधिकाधिक पारदर्शकपणे व जलद गतीने होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी वर्गाला कार्यसंस्कृती व प्रशासकीय संस्कृतीचे महत्व पटवून देणे आवश्यक आहे.

संदर्भ ग्रंथ

१. बोरा पारस व शिरशाट श्याम, लोकप्रशासन शास्त्रे विद्या प्रकाशन औरंगाबाद, जून २०१३.
२. फडिया एवं फडिया,उच्चतर लोकप्रशासन साहित्यभवन प्रकाशन, आग्रा-२००१.
३.- बंग के.आर., प्रशासकीय सिद्धांत, विद्या प्रकाशन औरंगाबाद, २००४.
४. दुबे अशोककुमार, २१ वी शताब्दी मे लोकप्रशासन, टाटा मॅकग्रा हिल पब्लिशिंग कंपनी, नवी दिल्ली. २०११
५) एम. लक्ष्मीकांत, लोकप्रशासन,टाटा मॅकग्रा-हील पब्लिशिंग कंपनी, नवी दिल्ली २००६
६). पोहेकर प्रीती, लोकप्रशासनाची मुलतत्वे, अरुणा प्रकाशन, लातूर -२००८.
७) . पोहेकर प्रीती, लोकप्रशासनातील नव विचार प्रवाह, अरुणा प्रकाशन लातूर.२०१०
८) एकम्बेकर पंचशील,लोकप्रशासनातील नव विचार प्रवाह ,ओम साई प्रकाशन, नायगाव २०१०

कागदपत्र क्र.


RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | January 2019 | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | UGC Approved No. 40705
Special Issue 92, Recent Trends in Public Adinistration : Theories, Practice & Future



DEGLOOR VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR * Dist.Nanded



Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143


INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL


VOL. (II)

12 January 2019

SPECIAL ISSUE – 92


# Recent Trends In Public Adminstration : Theories, Practice & Future


**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
**Dr. Bidwe T.S.**
Assit. Prof. Head of Dept.
Public Administraion
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded



SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net



© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 400/-